पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, जकात विभाग
क्र. जकात/९/कावि/१०१९/२००८
दिनांक : ०९/०७/२००८

प्रति,
**मा. सहा. आयुक्त,**
नागरी सुविधा केंद्र
पिं. चिं. म.न.पा.

**विषय :- <u>नागरी सुविधा केंद्रांतर्गत - रहदारी पास कामकाज</u>**

महोदय,

पिंपरी चिंचवड हद्दीतील कंपन्यासाठी जकात विभागाचे रहदारी पास कामकाजासाठीचे अर्ज नागरी सुविधा केंद्रामार्फत स्विकृत केले जातात. सदर कंपन्यांच्या सोयीसाठी ४ दिवसांचे मुदतीत प्रकरणे निकाली काढणेत येते. सदर कंपन्याचे कामकाज जलद व पारदर्शकता होणेसाठी अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडणेची आवश्यकता आहे.

१) स्थानिक खरेदी असल्यास त्याचे बील
२) मुळ माल आयातीचे बिल
३) मूळ मालावर भरलेल्या जकातीची पावती. (कंपनी खातेदार असलेस या मालाची जकात मासिक प्रपत्राद्वारे भरले बाबत प्रमाणपत्र)
४) प्रक्रियेसाठी/दुरूस्तीसाठी जाणाऱ्या मालाचे चलन
५) यापूर्वी परवानगी घेतली असल्यास मागील पत्राची झेरॉक्स.
६) विहित नमुन्यातील मासिक प्रपत्र - सही व शिक्यानिशी
७) विविध प्रक्रियासबंधी खातरजमा होणेसाठी जाणारा व येणाऱ्या मालाचे ३ कलर फोटो प्रिन्ट व त्यावर कंपनीचा शिक्का व सही
८) मुख्य कार्यालयातील विहित नमुन्यातील रहदारी पास अर्ज पूर्ण भरलेला कंपनीचा शिक्का व सही - ३ प्रतीत
९) दरफरक तपासणी फरक रक्कम असलेस भरलेची पावती
१०) Check Memo list व मालासंबंधी विविध प्रक्रियेबाबतचा तपशिल - २ फॉर्म

उपरोक्त प्रमाणे परिपूर्ण भरलेले अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अर्ज दाखल करतेवेळी नागरिंकांस कळवावे, एक प्रत सूचना फलकावर प्रर्दशित करुन सहकार्य करावे.ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
**सहाय्यक आयुक्त, जकात**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.